**महाराष्ट्र शासन** (स्थापित)

## औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, शाखा कार्यालय, जालना, औरंगाबाद

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नौकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ व २००५अंतर्गत कलम ६ (१) अन्वये स्थापीत कार्यालय - व्दारा, कामगार उपआयुक्त यांचे कार्यालय, विकास भवन, चौथा मजला, डॉ. राजेंद्र प्रसाद मार्ग, बाबा पेट्रोल पंपाजवळ,अदालत रोड, औरंगाबाद ४३१००१ दुरध्वनी – ०२४० -३२२३०१

जावक क्रमांक : ४५५/२०२३ दिनांक :- १५/०६/२०२३

### आदेश

विषय :- औरंगाबाद जिल्हयातील व शाखा कार्यालय जालना जिल्हयातील सुरक्षा रक्षक मंडळातील सुरक्षा रक्षकांचे वेतननिश्चिती / वेतन पुर्ननिर्धारीत करणे बाबत.

महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्रमांक एसजीए /१४२००२/९१५/-कामगार -५, दिनांक १२ नाव्हेंबर २००२ अन्वये औरंगाबाद जिल्हयासाठी महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नौकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ व २००५ व महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नौकरीचे नियमन व कल्याण) योजना २००२ व २००५ लागु केलेली आहे.

महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्रमांक एसजीए /१३२००२/२०२/१२/५, दिनांक ०६ फेब्रुवारी २००३ अन्वये औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक एक सदस्यीय मंडळ स्थापन केलेले आहे.

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नौकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ व २००५ च्या कलम ६ नुसार एकसदस्यीय मंडळाच्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नौकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ व २००५ च्या कलम ०३ (२) (५) अन्वये महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नौकरीचे नियमन व कल्याण) योजना २००२ व २००५ च्या खंड ३० अन्वये मंडळाने औरंगाबाद जिल्हयातील व शाखा कार्यालय जालना जिल्हयातील सुरक्षा रक्षकांचे वेतन निश्चितीचा प्रस्ताव मा.सह आयुक्त कामगार (माथाडी) मुंबई यांना दिनांक १३/०४/२०२३ रोजी सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.सह आयुक्त कामगार (माथाडी),मुंबई यांचे दिनांक ०९/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये व मा.अवर सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दिनांक ०२/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्व्ये सुरक्षा रक्षकांच्या वेतनामध्ये रक्कम रुपये १४२९/- तीन वर्षाकरीता वाढ करण्यास मान्यता दिलेली आहे.

तसेच कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई यांचे दिनांक **०१/०२/२०२३** च्या परिपत्रकानुसार किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगातील कामगारांकरीता दिनांक ०१/०१/२०२३ पासून महागाई भत्ता रक्कम रूपये **२,४४४/-** उपरोक्त वेतनामध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे.

मा.सह आयुक्त कामगार (माथाडी),मुंबई यांचे दिनांक ०९/०५/२०२३ रोजीच्या आदेशान्वये व शासनाने दिनांक ०२/०५/२०२३ रोजी दिलेल्या आदेशान्वये औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या व शाखा कार्यालय जालना जिल्हयातील नोंदीत सुरक्षा रक्षकांचे मूळ वेतन व तद्अनुषांगिक भत्यामध्ये दिनांक **०१ ऑगस्ट २०२२** पासून तीन वर्षाच्या कालावधीसाठी खालील प्रमाणे वेतन निश्चित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | मूळ वेतन रूपये दिनांक १/८/२०२२ पासून | महागाई भत्ता रूपये १/१/२०२३ पासून | घरभाडे भत्ता ५% (मूळ वेतन+ महागाई भत्ता) | वाहन भत्ता रूपये | धुलाई भत्ता रूपये | शैक्षणिक भत्ता रूपये | एकुण वेतन रूपये | लेव्ही ४०.५०% (मूळ वेतन + महागाई भत्ता) रूपये | ईएसआयसी ३.२५% (घरभाडे भत्ता +वाहन भत्ता + शैक्षणीक भत्ता+ अतिरीक्त कामकाज) रूपये | एकुण रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | सुरक्षा रक्षक | १३२७४ | २४४४ | ७८६ | ६६० | ५५० | ६६० | १८३७४ | ६३६६ | ६८ | २४७७८ |
| ०२ | सुरक्षा पर्यवेक्षक | १३८८७ | २४४४ | ८१७ | ६६० | ५५० | ६६० | १९०१८ | ६६१४ | ६९ | २५७०१ |
| ०३ | सुरक्षा अधिकारी | १४५१३ | २४४४ | ८४८ | ६६० | ५५० | ६६० | १९६७५ | ६८६७ | ७० | २६६१२ |

या अनुषंगाने व उपरोक्त अधिसूचना व अधिनियमातील तरतूदी नुसार औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या व शाखा कार्यालय जालना येथील सुरक्षा रक्षकांचे मूळ वेतनाचे दर दिनांक ०१ ऑगस्ट २०२२ ते पुढील तीन वर्षाच्या कालावधीकरीता वरील प्रमाणे निश्चित करण्यात येत असून आस्थापनेने वरील प्रमाणे वेतन अदा करणे आवश्यक आहे.

१. मंडळाच्या दिनांक ०५/०६/२०२३ रोजी एकसदस्यीय मंडळाच्या ठरावानूसार औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या व शाखा कार्यालय जालना येथील सुरक्षा रक्षकांचे उपरोक्त प्रमाणे किमान वेतन जाहीर करण्यात येत आहे.

२. मा.कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई यांचे दिनांक **०१/०२/२०२३** च्या परिपत्रकानुसार किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगातील कामगारांकरीता दिनांक ०१/०१/२०२३ पासून महागाई भत्ता रक्कम रूपये **२,४४४**/- उपरोक्त वेतनामध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे.

३. उपरोक्त वेतनामध्ये साप्ताहिक सुट्टीचा समावेश असेल. सदरचे दर दररोज आठ तासाच्या कामाच्या एका पाळी करीता महिण्यातील २६ दिवसाकरीता लागु आहेत. दैनंदिन वेतनात मुळ वेतन, महागाई भत्ता व इतर भत्ते मिळुन येणा-या एकुण वेतनास २६ ने भागून येणारा भागाकार पूर्णाकांत करून एक दिवसाचे वेतन काढण्यात येईल. (तसेच फेब्रुवारी महिन्यासाठी उपरोक्त वेतन हे २४ दिवसाकरीता लागू असून वेतनास २४ ने भागावे)

४. सुरक्षा रक्षकांनी केलेल्या अतिरीक्त कामाचे (Over Time) दर हे मुळ वेतन अधिक महागाई भत्ता मिळून येणा-या एकुण रक्कमेस २६ ने भागुन येणारा भागाकार पुर्णाकांत करुन एक दिवसाचे वेतन काढण्यात यावे. तसेच फेब्रुवारी महिण्यासाठी मुळ वेतन + महागाई भत्ता मिळून येणा-या एकुण रक्कमेस २४ ने भागुन येणारा भागाकार पुर्णाकांत करुन एक दिवसाचे वेतन काढण्यात यावे. व सदर रक्कमेच्या दुप्पट वेतन अतिरिक्त कामकाजासाठी देणे बंधनकारक राहील.

५. उपरोक्त किमान वेतनावर (मुळ वेतन + महागाई भत्ता) **४०.५०%** दराने लेव्ही देणे तसेच घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता, शैक्षणिक भत्ता व अतिरीक्त कामकाजावर (ओ.टी.वर) **३.२५%** दराने लेव्ही देणे मुख्य मालकास / नियोक्त्यास सुरक्षा रक्षका करता उपरोक्त अधिनियम व योजनेतील तरतुदीनूसार देणे बधंनकारक राहील.

६. मंडळाने सुरक्षा रक्षकांसाठी उपरोक्त प्रमाणे निश्चित केलेले वेतनाचे दर दिनांक **०१ ऑगस्ट २०२२** पासून पुढील आदेशा पर्यंत अंमलात राहतील.

७. नोंदीत मुख्य मालकांनी त्यांच्याकडे नोंदीत तैनात असलेल्या सर्व वर्गवारीच्या सुरक्षा रक्षकांचे देय वेतन व लेव्हीची रक्कम दरमहा **०५** तारखेपर्यंत धनादेशाव्दारे / आरटीजीएसव्दारे मंडळाच्या कार्यालयात जमा करणे मुख्य मालकावर बंधनकारक राहील.

अन्यथा महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नौकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ व २००५ व महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नौकरीचे नियमन व कल्याण) योजना २००२ व २००५ च्या तरतुदीनूसार कारवाई करण्यात येईल.

( चं.अं.राऊत )
कामगार उपआयुक्त तथा अध्यक्ष,
औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक एकसदस्यीय मंडळ,
शाखा कार्यालय, जालना,औरंगाबाद

प्रति,

---------------------------------------

---------------------------------------

---------------------------------------